संचाच्या पृष्ठभागावर तेजवर्मन याने जे पुरवणी दानपत्र कोरविले आहे त्यातील दानही जयपूर येथील वरील नारायण मंदिरासच होते. यावरून त्या काळी जयपूर हे एक धार्मिक क्षेत्र असल्याचे दिसते. वत्स आणि डिस्कळकर यांनी जयपूर ही भोगशक्तीची राजधानी असून त्याचे समीकरण अंजनेरीच्या पश्चिमेस असलेल्या जव्हार बु॥ या गावाशी केले आहे जे अर्थातच बरोबर वाटत नाही. कारण प्रस्तुत ताम्रपटात जयपूर येथील नारायण मंदिराशिवाय इतरही अनेक मंदिरे असल्याची नोंद आढळते. विशेष म्हणजे जयपूर येथे प्रतिवर्षी होणाऱ्या मार्गशीर्ष मासातील यात्रा उत्सवाचे सविस्तर वर्णन त्यात करण्यात आलेले आहे. या यात्रोत्सवाच्या व्यवस्थेसाठी जयपूर येथील दहा प्रमुख व्यापाऱ्यांची एक समिती नेमण्यात आली होती. जयपूर येथील देवस्थानांची सर्व व्यवस्थाही या समितीकडे सोपविण्यात आली होती. नारायण मंदिरासाठी दिलेल्या दानाव्यतिरिक्त यात्रोत्सवाच्या खर्चासाठी भोगशक्तीने जयपूर येथील वणिकश्रेणीकडे विशिष्ट रक्कम कायमची ठेव म्हणून ठेवली होती. यावरून स्पष्ट होते की जयपूर हे केवळ धार्मिक क्षेत्रच नसून ती एक व्यापारी पेठही होती. तेव्हा गत काळातील वैभवाच्या काही तरी खाणाखुणा तसेच मार्गशीर्षातील यात्रोत्सवाची परंपरा जयपूरचा वारसा सांगणाऱ्या गावी आजही असल्याच पाहिजेत. नासिक जिल्ह्यातील जव्हार इथे यापैकी कशाचेही अस्तित्व आज जाणवत नाही. तसेच भाषिक दृष्ट्याही जयपूरचे जव्हार हे आजचे नाव सयुक्तिक वाटत नाही. सबब जयपूर म्हणजे जव्हार हे समीकरण बरोबर नाही.

ताम्रपटातील जयपूरच्या वर्णनाशी तंतोतंत जुळणारे आणि भाषिक दृष्ट्याही जयपूरशी जवळीक असणारे एकमेव स्थान म्हणजे पुण्याजवळील खण्डोबाची जेजुरी. महाराष्ट्रातील एक प्रमुख दैवत खण्डोबा किंवा मल्हारी याचे हे मुख्य पीठ होय. विशेष म्हणजे अद्यापही प्रतिवर्षी मार्गशीर्ष शुक्ल पक्षात चंपाषष्ठीच्या वेळेस येथे वार्षिकोत्सव होत असून त्या वेळी फार मोठी यात्रा इथे भरते. केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर आंध्रप्रदेश आणि कर्नाटकातूनही इथे यात्रेसाठी भक्त येतात. जेजुरी ही एक व्यापारी पेठ असून गेल्या शतकातच इथे नगरपालिका स्थापन करण्यात आली. अनेक मंदिरांनी गजबजलेले हे नगर उंच टेकडीवर वसले असून एक प्राचीन धार्मिक क्षेत्र असल्याचे सकृद्दर्शनीच जाणवते.[९] भाषिकदृष्ट्याही जेजुरी हे 'जयपुरी' या संस्कृत नामाचे त्यातील दुसऱ्या 'य' चे 'ज' मध्ये रूपांतर होऊन आणि 'प' चा लोप होऊन झालेले आजचे मराठी रूप होय. खुद्द जेजुरी येथे चालुक्य विनयादित्याच्या काळातील ताम्रपट सापडला आहे.[१०] तसेच याच काळातील जळगाव जिल्ह्यातील मुंदखेड इथे सापडलेल्या सेंद्रक जयशक्तीच्या ताम्रपटात ज्या 'जयपूरद्वारी' नगराचा उल्लेख आलेला आहे तोही जेजुरीचाच असला पाहिजे.[११] कै. मिराशी यांनी 'जयपुरद्वारी'चे समीकरण नासिक जिल्हातील नांदगाव जवळील जेऊरसी केले आहे. भाषिक दृष्ट्या ते बरोबर वाटत असले तरी आजचे जेऊर चालुक्य काळात महत्त्वाचे ठिकाण असल्याचे जाणवत नाही. मुंदखेडे ताम्रपट दिला तेव्हा राजाचा मुक्काम 'जयपुर-

द्वारी' इथे होता. यावरून त्या काळी हे एकतर राजकीय किंवा धार्मिक महत्त्व असलेले ठिकाण होते हे स्पष्ट होते. त्यामुळे हे वर्णनही जेजुरीसच अधिक लागू पडते.

कै. श्री. ग. ह. खरे यांच्या मते खण्डोबा किंवा मल्लारी हे दैवत शिव आणि सूर्य देवतांच्या एकरूपत्वातून निर्माण झाले आहे.[१२] केवळ 'खण्डोबा' या नावाचा विचार केल्यास मात्र त्याचे सान्निध्य शिवपुत्र स्कंद–कार्तिकेय याच्याशी जाणवते. बदामी चालुक्यांच्या बहुतेक ताम्र–शिलाशासनात चालुक्य वंशाचे परिरक्षण करणारी देवता म्हणून कार्तिकेयाची महती गायिलेली आहे. भोगशक्ती हा चालुक्यांचा मांडलिक होता. त्यामुळे त्याच्या काळात महाराष्ट्रात या देवतेस विशेष महत्त्व प्राप्त झाले असावे. जयपूर इथे नारायण मंदिराखेरीज इतरही देवालये असल्याची नोंद अंजनेरी ताम्रपटात आलेली आहेच. त्यात स्कंद–कार्तिकेयाचेही असणे असंभवनीय नाही. नारायण मंदिरात सातव्या शतकात सुरू झालेला मार्गशीर्षातील यात्रा उत्सव इतर मंदिरांबरोबर यातही होत असावा. खण्डोबा दैवताच्या वाढत्या लोकप्रियतेबरोबर मूळचा नारायण मंदिरातील हा उत्सव त्याचाच गणला जाऊ लागला व चंपाषष्ठीच्या रूपाने महाराष्ट्रभर पसरला असे दिसते. वत्स आणि डिस्कळकरांनी का. ना. दीक्षित यांचा हवाला देऊन महाराष्ट्रातील या चंपाषष्ठी उत्सवाचा उल्लेख केला आहे. परंतु जेजुरीशी आणि खण्डोबाशी असलेल्या त्याच्या संबंधावर मात्र त्यांनी भाष्य केलेले नाही. अशा रीतीने महाराष्ट्रातील एक प्रमुख दैवत खण्डोबा, त्याचे मुख्य पीठ जेजुरी आणि त्याचा मुख्य वार्षिक उत्सव चंपाषष्ठी यांची प्राचीनता इ. स. च्या सातव्या शतकापर्यंत सिद्ध होते. त्यामुळे प्राचीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने एक अतिशय महत्त्वाचे अव्वल दर्जाचे साधन म्हणून अंजनेरी ताम्रपटाचा उल्लेख करावा लागेल.

चंद्रपुरी म्हणजे प्राचीन कोंकणची राजधानी पुरी :

अंजनेरी ताम्रपटांचा दुसरा किंवा 'ब' या नावाने ओळखला जाणारा संच हा एक अनन्यसाधारण कोरीव लेख होय. कारण सर्वसामान्य कोरीव लेखात प्रामुख्याने आढळणाऱ्या केवळ दानाची नोंद यात नाही; तर उद्ध्वस्त झालेल्या दोन नगरांची पुनर्वसती हा त्याचा मुख्य विषय होय. ही नगरे म्हणजे चन्द्रपुरी आणि समगिरिपट्टण. बहुधा परकीय आक्रमणामुळे ही नगरे उद्ध्वस्त झाली व त्यामुळे तेथील रहिवासी आणि व्यापाऱ्यांनी इतरत्र स्थलान्तर केले होते. त्या सर्वांना या नगरात परत वसवून तेथील नागरी जीवन व्यापार–उदीम पूर्ववत करण्यासाठी भोगशक्तीने काही खास सवलती जाहीर केल्या आणि व त्यांची नोंद प्रस्तुत ताम्रशासनात केली. त्या सवलती अशा–

(१) चंद्रपुरी आणि समगिरिपट्टण तसेच त्यांच्या वाड्या किंवा उपनगरे असलेल्या अंबयूपल्लिका, सवानेयपल्लिका, मोरेयपल्लिका आणि कंसारिपल्लिका यांचे पुनर्वसतीकरण करून या नगरांची पूर्ववत भरभराट होण्याच्या दृष्टीने एक विशेष निगम स्थापन करण्यात

येऊन त्यांचे संचालन आणि प्रशासन एल आणि कर्पूर नामक व्यापाऱ्यांच्याकडे सोपविण्यात आले.

(२) या नगरात स्थायिक होणाऱ्या व्यापाऱ्यांना राज्यभर आयातशुल्कमुक्तता बहाल करण्यात आली.

(३) नावारस मालमत्तेच्या जप्तीविषयीचे नियम इथे वसती करणाऱ्या नागरिकांच्या बाबतीत शिथिल करण्यात आले. याचा अर्थ असा की गावे सोडून गेलेल्या परत येणाऱ्या लोकांच्या मालमत्ता त्यांना परत देण्यात आल्या; किंवा जे लोक परत आले नाहीत त्यांच्या मालमत्ता नव्याने स्थायिक होणाऱ्या इतर लोकांना देण्यात आल्या.

(४) येथील व्यापाऱ्यांना इतर ठिकाणच्या व्यापाऱ्यांकडून विशेष शुल्क गोळा करण्याचा अधिकार देण्यात आला.

वरील तरतुदी प्राचीन भारतातील आर्थिक प्रशासन व्यवस्थेवर नवा प्रकाश तर टाकतातच; शिवाय त्यावरून चंद्रपुरी आणि समगिरिपट्टण ही एकेकाळी समृद्ध अशी व्यापार–उदिमाची केंद्रे होती हेही स्पष्ट होते. तसेच ताम्रपटातील त्यांच्या एकत्र उल्लेखावरून व त्यांच्या प्रशासनव्यवस्थेच्या समान तरतुदीवरून ती जुळी किंवा परस्परांच्या अगदी जवळ असलेली नगरे जाणवतात.

पूर्वीच्या संपादकांनी समगिरिपट्टणची निश्चिती केलेली नाही. चंद्रपुरी म्हणजे अंजनेरी जवळील ‘ चंद्रयांची भेट ’ हे गाव असावे असे त्यांनी सुचविले आहे. परंतु ही निश्चिती बरोबर नाही. कारण या गावाचे नाव ‘ भेट ’ असे असून त्या नावाच्या इतर गावापासून त्याचे वेगळेपण दाखविण्यासाठी ‘ चंद्रयांची ’ (म्हणजे तेथे राहणाऱ्या ‘ चंद्रे ’ आडनावाच्या लोकांची) हे पूर्वपद त्याला जोडण्यात आले आहे. तसेच ताम्रपटातील वर्णनाप्रमाणे व्यापारउदिमाचे केंद्र म्हणून प्राचीन काळातील वैभवाचा लवलेशही इथे आढळत नाही. त्यामुळे या स्थलनामाच्या निश्चितीसाठी त्यांचा इतर कोरीव लेखातील उल्लेख विचारात घेऊन त्यानुसार मार्ग शोधावा लागेल.

बदामी चालुक्य नरेश विजयादित्य याच्या याच काळातील निर्गुण्डी किंवा बोपगाव ताम्रपटांत ‘ समगिरी ’ या विषयविभागाचे मुख्यालय म्हणून उल्लेख आलेला आहे.[१३] समगिरी आणि अंजनेरी ताम्रपटातील समगिरिपट्टण एकच होत. विजयादित्याच्या बोपगाव ताम्रपटाचे प्राप्तिस्थल पुणे जिल्ह्यातील पुरंदर किल्ल्याजवळ असल्याच्या आधारावर समगिरी हे पुरंदरचे प्राचीन नाव असावे असे मत व्यक्त करण्यात आले आहे. परंतु भाषिक दृष्ट्या तर ते सुतराम शक्य नाहीच; शिवाय अंजनेरी ताम्रपटातील वर्णनाप्रमाणे पुरंदर हे त्या काळी व्यापारी केंद्र असल्याची त्याची ख्याती नाही. तसेच पुरंदरजवळ चंद्रपुरीचा वारसा बाळगणारे ठिकाण अस्तित्वात नाही. त्यामुळे ही दोन्ही स्थाने इतरत्र असण्याचीच शक्यता आहे.

‘ चंद्रपूर ’ हे स्थलनाम शिलाहार अपराजिताच्या मुरुड–जंजिरा ताम्रपटात नमूद

करण्यात आले आहे. त्याची निश्चिती गोव्यातील चांदोरशी करण्यात आली आहे.[१४] परंतु ती बरोबर नाही. कारण अपराजित हा उत्तर कोंकणचा शासक असून दक्षिण कोंकण व गोवा त्या काळी शिलाहार वंशाच्या दुसऱ्या शाखेच्या अंमलाखाली होते. त्यामुळे मुरुड–जंजिरा ताम्रपटातील ‘ चंद्रपूर ’ हे उत्तर कोंकणातच असले पाहिजे.

दक्षिण कोंकणावर राज्य करणाऱ्या शिलाहार राजांच्या पट्टणकुडी[१५] आणि खारेपाटण[१६] ताम्रपटातही ‘ चंद्रपूर ’ किंवा ‘ चंद्रमण्डला ’चा उल्लेख आलेला आहे. या वंशातील अय्यपराज आणि भीम यांनी जिंकलेल्या प्रदेशांच्या संदर्भात तो आलेला असल्यामुळे ‘ चंद्रपूर ’ हे त्यांच्या राज्यात म्हणजे दक्षिण कोंकणात किंवा गोव्यात नव्हते हे सिद्ध होते, विशेष म्हणजे खारेपाटण ताम्रपटात ‘ चंद्रपूर ’ आणि येमूल्य (चौल बंदर जिल्हा रायगड) ही परराज्यातील बंदरे असल्याचे वर्णन आलेले आहे. यावरून ‘ चंद्रपूर ’ हे पश्चिम किनारपट्टीवरील बंदर असून ते चौलच्या आसपास असल्याची अतिशय महत्त्वाची माहिती मिळते.

इ. स. च्या सातव्या शतकात कोंकणवर बदामी चालुक्यांची सत्ता प्रस्थापित होण्यापूर्वी मौर्यांचे राज्य होते. उत्तर कोंकणात पुरी येथे त्यांची राजधानी होती. ‘ अपर जलधेर्लक्ष्मी ’ असे तिचे वर्णन पुलकेशीच्या ऐहोळे शिलालेखात आले आहे.[१७] शिलाहारांच्या ताम्रपटातील चौल जवळील चंद्रपूर, अंजनेरी ताम्रपटांतील चंद्रपुरी आणि मौर्यांची उत्तर कोंकणातील राजधानी पुरी हे एकाच नगराचे वेगवेगळे उल्लेख आहेत या निष्कर्षाप्रत यावे लागते. कारण चालुक्य सम्राट द्वितीय पुलकेशी याने घनघोर नाविक युद्ध करून पुरी जिंकली व मौर्य सत्ता कोंकणातून नामशेष केल्याचे सविस्तर वर्णन त्याच्या ऐहोळे शिलालेखात रविकीर्तीने केले आहे. या युद्धातील विध्वंसता पश्चिमसागर लक्ष्मी असलेली पुरी उद्ध्वस्त झाली. कालांतराने पुलकेशीच्या उत्तराधिकाऱ्यांच्या काळात कोंकण भोगशक्तीच्या अंमलाखाली आला व पुरी किंवा चंद्रपुरीचे पश्चिमसागरावरील महत्त्वाचे स्थान लक्षात घेऊन त्याने उजाड झालेल्या या बंदराचे पुनर्वसतीकरण केले व अतिशय महत्त्वाची बाब म्हणून अंजनेरी ताम्रशासनात त्याची नोंद करून ठेवली. कोरीव लेखातील वर्णन आणि समकालीन राजकीय घटना यांच्यातील सुसंगतीवरून पुरी, चंद्रपुरी आणि चंद्रपूर हे एकच होत यांविषयी संशय उरत नाही.

अंजनेरी ताम्रपटातील चंद्रपुरी म्हणजे उत्तर कोंकणची राजधानी पुरी होय या निष्कर्षाप्रत आपण आलो. परंतु ही पुरी नेमकी कुठे होती याविषयी संशोधकांत एकवाक्यता नाही. आज बृहन्मुंबईत समाविष्ट असलेले अंधेरीतील मरोळ,[१८] मुंबईजवळील घारापुरी किंवा एलेफंटा बेट[१९] आणि रायगड जिल्ह्यातील दण्डराजापुरी हे विविध संशोधकांनी सुचविलेले पुरीचे आजचे विविध पर्याय होत. अंजनेरी ताम्रपटात पुरीचा चंद्रपुरी म्हणून करण्यात आलेला उल्लेख पुरी म्हणजे घारापुरी किंवा एलेफंटा बेटच होय हे निःसंशय सिद्ध करतो. कारण मध्ययुगीन पोर्तुगीज साधनात या बेटाचा उल्लेख (The Island of Pori) असा

करण्यात आलेला आहे.[२१] यावरून पुरी म्हणजे घारापुरीच होय हे सिद्ध होते. स्थानिक परंपरेनुसार या बेटाचे जुने नाव 'संतपूर' असे होते.[२२] १० व्या शतकातील अरब खलाश्यांच्या वर्णनात भडोचच्या दक्षिणेस असलेल्या पश्चिम किनाऱ्यावरील 'संदबूर' या बंदराचे वारंवार उल्लेख आढळतात.[२३] इद्रिसीच्या वृत्तान्तानुसार 'संदबूर' हे या परिसरातील प्रमुख व्यापारी बंदर असून उत्कृष्ट इमारती आणि भव्य बाजारपेठांनी गजबजलेले असे. या बंदरात जहाजे नेहमी नांगरून पडलेली असत. 'संदबूर' आणि घारापुरीचे जुने नाव 'संतपूर' हे उपरिनिर्दिष्ट कोरीव लेखातील चंद्रपूर किंवा चंद्रपुरीची भ्रष्ट रूपे होत. यावरून पुरी किंवा चंद्रपुरी म्हणजे घारापुरीच होय हे निर्विवाद सिद्ध होते. मरोळ किंवा दण्डराजपुरीचे प्राचीन काळातील नाव चंद्रपुरी असल्याची परंपरा नाही. ऐहोळे शिलालेखात पुलकेशीने पुरी जिंकण्यासाठी शेकडो युद्धनौकांचा वापर केल्याची नोंद आहे. यावरून मौर्यांची राजधानी पुरी ही कोंकणच्या मुख्य भूभागापासून अलग व खोल समुद्रात होती हे ध्वनित होते. कोंकणच्या किनारपट्टीवरील सर्व बेटांत केवळ घारापुरीची भौगोलिक स्थितीच त्या वर्णनाशी जुळणारी आहे.

या निश्चितीस जे संशोधक आक्षेप घेतात त्यांच्या मते घारापुरी हे मुख्य भूभागापासून दूर व दुर्गम अशा ठिकाणी असल्यामुळे तसेच वसतीच्या दृष्टीने गैरसोयीचे असल्यामुळे इथे राजधानी असण्याची शक्यता फार कमी होय. या आक्षेपाचे मुख्य कारण म्हणजे आज या बेटावर जाण्यासाठी मुंबईतील गेटवे ऑफ इंडियाच्या धक्क्यापासून १२ कि. मी. अंतर कापून जावे लागते. परंतु त्या काळी उरणजवळील न्हावा-शेवा बंदरातून या बेटावर येण्याचा मार्ग होता. हे अंतर अवघ्या ३–४ कि. मी. एवढे आहे. त्यामुळे हे बेट दुर्गम दूर अंतरावर होते या म्हणण्यात तथ्य नाही. तसेच या ठिकाणी आज तर वसती आहेच; परंतु इ. स. च्या दुसऱ्या शतकातील अवशेष व लेणी इथे आहेत. प्राचीन काळातील भव्य इमारतींचे अवशेष बेटावर ठिकठिकाणी आजही आढळतात. समुद्र मागे हटविण्यासाठी भरती घालण्याच्या कामात येथील बरेच अवशेष नष्ट झाले आहेत.

सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे सध्या घारापुरीच्या समोर कोंकणच्या मुख्य भूमीवर न्हावा-शेवा इथे मुंबईस पर्यायी ठरणारे अद्ययावत बंदर उभारण्यात येत आहे. यावरून घारापुरीचा सागरी परिसर उत्कृष्ट बंदरासाठी किती आणि कसा योग्य होता हे वेगळे सिद्ध करण्याची आवश्यकता नाही. यावरून कोंकणची या प्राचीन काळातील राजधानी पुरी आणि अंजनेरी ताम्रपटातील चंद्रपुरी म्हणजे घारापुरीच होय हा निष्कर्ष निघतो.

पुरीचे चंद्रपूर किंवा चंद्रपुरी हे नाव कोंकणातील मौर्यांच्या शासनकाळातील असावे. कारण मौर्यांचा मूळ पुरुष चंद्रगुप्त होता. तसेच चंद्रवर्मन या नावाचा राजा कोंकणातील मौर्य घराण्यात होऊन गेल्याची माहितीही त्याच्या गोवा ताम्रपटावरून मिळते.[२४] किंबहुना, असेही म्हणता येईल की या बेटाचे मूळ नाव 'पुरी' असून कोंकणातील विविध राजवटींत या राजधानीस विविध पूर्व किंवा उपपदे जोडण्यात आली. मौर्यांच्या नंतर कोंकणवर

बदामीच्या चालुक्यांची सत्ता प्रस्थापित झाली. चालुक्य मंगलरस याच्या शासनकाळात त्याची राजधानी मंगलापुरी होती.[२५] म. म. मिराशींनी मंगलापुरीची निश्चिती ठाणे जिल्ह्यातील मागाठाणशी केली आहे. त्याऐवजी ते पुरी किंवा चंद्रपुरीचे मंगलरसाच्या कारकीर्दीतील तात्पुरते नामान्तर असण्याचीच अधिक शक्यता आहे. शिलाहार काळातील कोरीव लेखांत तिचा 'श्रीपूर' किंवा 'श्रीपुरी' म्हणून उल्लेख आढळतो.[२६] कोंकणच्य या प्राचीन राजधानीचे नाव या प्रदेशाशी कायमचे जोडले गेले होते. त्यामुळे बऱ्याच कोरीव लेखात केवळ 'कोंकण' या देशनामाऐवजी 'पुरिकोंकण' असा उल्लेख आढळतो. शिलाहार काळात तर 'पुरी' म्हणजे उत्तर कोंकण असे समीकरण रूढ झाले होते. चिनी प्रवाशी युवान च्वांग याच्या वर्णनातील 'कोंकणपूर' म्हणजे पुरीच असली पाहिजे.[२७]

पुरीच्या विविध काळातील या पूर्व किंवा उपपदावरून असे वाटते की मौर्यांच्या पूर्वी कोंकणचे सत्ताधीश असलेल्या त्रैकूटकांची राजधानी अनिरुद्धपुरी म्हणजे पुरी किंवा घारापुरीच असली पाहिजे. कारण ही अनिरुद्धपुरी नक्की कुठे होती याचा अद्याप शोध लागलेला नाही. त्रैकूटकांचे दोन ताम्रपट गुजराथेतील सुरत जिल्ह्यात सापडल्याच्या आधारावर अनिरुद्धपुरी ही सुरत जिल्ह्यात बारडोलीजवळ कुठेतरी असावी असे मत काही संशोधकांनी व्यक्त केले आहे.[२८] परंतु या नावाशी सादृश्य असणारे स्थलनाम दाखविले गेले नसल्यामुळे हे मत ग्राह्य मानता येत नाही. संख्येचाच विचार करायचा झाल्यास त्रैकूटकांच्या एकूण पाच प्रसिद्ध झालेल्या ताम्रपटांपैकी तीन कोंकणात व दोन गुजराथेत सापडले आहेत.[२९] शिवाय त्यांच्या ताम्रपटात त्रैकूटक हे 'अपरान्तादि' देशाचे म्हणजे प्रामुख्याने कोंकणचे अधिपती असल्याची आवर्जून नोंद करण्यात आलेली आहे. त्यांचे उत्तराधिकारी मौर्य यांच्या काळात असलेली पुरी हीच त्यांची राजधानी असली पाहिजे. घारापुरीशी संबंधित ज्या अनेक आख्यायिका प्रचलित आहेत त्यांतील एक पुरी म्हणजे अनिरुद्धपुरी असल्याचे सूचित करते.[३०] या आख्यायिकेनुसार घारापुरी ही पूर्वी बाणासुराची राजधानी होती. त्याची कन्या उषा हिचा विवाह द्वारकेचा राजकुमार आणि कृष्णाचा नातू अनिरुद्ध याच्याशी इथे झाला होता. एरव्ही आख्यायिकांना इतिहासाचे साधन म्हणून महत्त्व दिले जात नाही. परंतु या बेटाचा 'अनिरुद्ध' या नावाशी केव्हा तरी संबंध आला होता हे त्यावरून ध्वनित होते. त्रैकूटक काळातील अनिरुद्धपुरी हे नाव पुढे बदलण्यात येऊनही त्याची स्मृती या आख्यायिकेच्या रूपाने रूढ झाली असे दिसते.

चंद्रपुरी आणि समगिरिपट्टण ही नगरे जुळी किंवा एकमेकांच्या अगदी जवळ असल्याचे अंजनेरी ताम्रपटातील त्यांच्याविषयीच्या वर्णनावरून जाणवते. चंद्रपुरी हे सागरी बंदर होते हेही स्पष्ट झाले आहे. 'पट्टण' या उपपदावरून समगिरी हेही बंदर असल्याचे जाणवते. कारण इतरत्र 'पट्टण' पदान्त स्थलनामे नदी किंवा समुद्रावरील बंदरे असल्याची कित्येक उदाहरणे कोरीव लेखात आढळतात. घारापुरी बेटाच्या पूर्वेस मुख्य भूभागावर जे शेवा बंदर आहे ते अंजनेरी ताम्रपटातील समगिरिपट्टण असण्याची शक्यता आहे. कारण

ते घारापुरीपासून जवळ तर आहेच; शिवाय बोपगाव आणि अंजनेरी ताम्रपटातील समगिरीच्या जवळ दाखविलेली स्थलनामे घारापुरी-शेवा-उरण परिसरात अस्तित्वात आहेत. ती पुढीलप्रमाणे होत.[३१]

ताम्रपटाचे नाव	त्यातील स्थलनाम	आजचा पर्याय	तालुका	जिल्हा
१. निर्गुण्डी किंवा बोपगाव	समगिरी विषय	शेवा	उरण	रायगड
२. ताम्रपट	निर्गुण्डी	निगडे	,,	,,
३. ,,	दविलग्राम	दवळे	,,	,,
४. अंजनेरी ताम्रपट	समगिरि पट्टण	शेवा	,,	,,
५. ,,	चंद्रपुरी	घारापुरी	,,	,,
६. ,,	मोरेयपल्लिका	मोराबंदर (घारापुरी)	,,	,,
७. ,,	आंबेयपल्लिका	आंबिवली	पनवेल	,,
८. ,,	सवानेयपल्लिका	सवाने	,,	,,
९. ,,	कंसारिपल्लिका	कासारघाट	,,	,,

समगिरीचा आजचा पर्याय शेवा हा भाषिक दृष्ट्या सदोष जाणवतो. परंतु स्थलनामाचे प्राचीन काळातील रूप व त्याचा आजचा पर्याय यांच्यात बऱ्याच वेळा अनाकलनीय बदल झालेला दिसतो. राष्ट्रकूट नरेश तृतीय गोविंद याच्या पैठण ताम्रपटात समतीर्थक या गावाचा उल्लेख आलेला आहे.[३२] त्याचा आजचा पर्याय शेवता (ता. पैठण, जि. औरंगाबाद) हे गाव होय.[३३] यावरून समगिरीचा आजचा पर्याय शेवा हा अशक्य वाटू नये.

कोंकणची प्राचीन काळातील राजधानी पुरी म्हणजे घारापुरी होय हे अंजनेरी ताम्रपटातील चंद्रपुरीच्या उल्लेखामुळे स्पष्ट झाले. पुलकेशीच्या आक्रमणाच्या वेळी उद्ध्वस्त झालेल्या पुरीस भोगशक्तीने पूर्वीचे वैभव प्राप्त करून दिले. त्याचा परिणाम म्हणजे राजकीय आणि व्यापारी केंद्र म्हणून पुरीचे स्थान इ. स. च्या १० व्या शतकाच्या अखेरीपर्यंत कायम राहिले. शिलाहारांच्या ताम्रशिलाशासनातील 'श्रीपूर' आणि 'चंद्रपूर'चे वारंवार आढळणारे उल्लेख तसेच अरब खलाश्यांच्या वृत्तान्तातील 'संदबूर'चे उल्लेख यास पुष्टी देतात. इतकेच नव्हे तर शिलाहार अपराजिताच्या कारकीर्दीपर्यंत म्हणजे इ. स. च्या दहाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत पुरी हीच शिलाहारांची राजधानी होती असे दिसते. अपराजिताच्या या राजधानीवर कल्याणचा चालुक्य राजा सत्याश्रय इरिव बेडंग याने आपल्या नौदलाच्या सहाय्याने दहाव्या शतकाच्या शेवटी आक्रमण केले. या वेळी झालेल्या घनघोर सागरी युद्धाचे वर्णन कन्नड कवी रण्ण याच्या 'गदायुद्ध' ग्रंथात करण्यात आले

आहे.[३४] या दुसऱ्या विध्वंसानंतर मात्र पुरीचा ऱ्हास सुरू झाला. या पुढील काळात स्थानक किंवा ठाणे इथे शिलाहार राजांनी आपली राजधानी हलविली.[३५] पुरीचे पूर्वीचे स्थान तिला यानंतर कधीही प्राप्त होऊ शकले नाही. काळाच्या पडद्याने तिची स्मृती एवढी धूसर बनविली की ही पुरी नेमकी कुठे होती याविषयीही निश्चित माहिती मागे उरली नाही. अंजनेरी ताम्रपटातील चंद्रपुरीच्या पुनर्वसतीकरणाच्या वर्णनावरून तिचा ठावठिकाणा घेणे शक्य झाले. त्या दृष्टीने या ताम्रपटांचे महत्त्व आणखी द्विगुणित होते.

संदर्भ सूची :

१. Epigraphia Indica, Vol. XXV, pp. 225–238.
२. Corpus Inscriptionum Indicarum, Vol. IV. Part I, pp. 146–154.
३. The Classical Age, p. 65.
४. (1) D. C. Sircar, Successors of the Satavahanas in lower Deccan, p. 35.
(2) Epigraphia Indica. Vol. XX, p. 6.
५. The Classical Age op. cit.
६. V. V. Mirashi, C. I. I. Vol. VI, Introduction pp. i, ii.
७. ग. ह. खरे, दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, खण्ड १, पृ. १–१५.
८. K. V. Ramesh, Chalukyas of Vatapi, p. 152.
९. Bombay Gasetteer, Vol. XVIII, part III, Poona district pp. 132–133.
१०. E. I. Vol. XIX, pp. 62–65.
११. E. I. Vol. XXIX, pp. 116–121.
१२. G. H. Khare, Select Articles, pp. 68–72.
१३. भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, खण्ड ९, भाग २, पृ. १–६.
१४. Important Inscriptions from Baroda, pp 35–55.
१५ C. I. I., Vol. VI, Ins. No. 6.
१६. I. A. Vol. IX, p. 33. E. I. Vol. III, pp. 292–302.
१७. E. I. Vol. VI, pp. 1–12.
१८. H. Cousens, Medieval Temples of the Deccan, p. 81.
१९. Bombay Gazetteer, Vol. XIV, Thana, pp. 59–98.
२०. V. K. Bhave, Proc. of the Indian History Congress, 1940, p. 86.

२१. Bombay Gazetteer, Vol., Thana op. cit.
२२. कित्ता
२३. कित्ता
२४. New Indian Antiquary, Vol. IV, pp. 181–184.
२५. E. I. Vol. XXVIII, pp. 17–22.
२६. C. I. I. Vol. VI, Ins. No. 21.
२७. Cunningham's Ancient Geography of India, p. 632.
२८. शोभना गोखले, महाराष्ट्रातील पुरातत्त्व, पृ. १५४–१६०.
२९. कित्ता.
३०. Bombay Gazetteer, Vol. XIV, op. cit.
३१. सर्व आधुनिक स्थलनामे महाराष्ट्र जनगणना वर्णक्रमावर आधारित आहेत.
३२. E. I. Vol. III, pp. 103–110.
३३. H. S. Thosar, Studies in the Historical and Cultural Geography and Ethnography of Marathwada, p. 70. (Unpublished Thesis).
३४. B. R. Gopal, Chalukyas of Kalyana and the Kalachuris, pp. 95–97.
३५. म. म. मिराशींच्या मते ठाणे ही प्रारंभापासून शिलाहारांची राजधानी होती. परंतु तशी शक्यता नाही. कारण अपराजित या आठव्या शिलाहार राजाच्या कारकीर्दीतील मुरूड जंजिरा ताम्रपटात ठाण्याचा राजधानी म्हणून पहिल्यांदा उल्लेख येतो. या पूर्वीचे ७ राजे पुरी येथूनच राज्य करीत असावेत. सत्याश्रय इरिव बेडंग चालुक्याच्या आक्रमणानंतर अपराजिताने ठाण्यास राजधानी स्थलांतरित केली असावी.

दक्खनमधील बृहदश्मयुगीन संस्कृतीचे उद्योगधंदे आणि व्यवसाय

प्रा. डॉ. ग. का. माने
मराठी महाविद्यालय, हैदराबाद

बृहदश्मयुगीन संस्कृती विश्वव्यापी असली तरी या लेखाची व्याप्ती दक्खनपुरती मर्यादित आहे. 'बृहदश्म' हा शब्द इंग्रजीतील 'Megalith' याचे मराठी रूपांतर असून इंग्रजीतील 'मेगॅलिथ' शब्द ग्रीक भाषेतील मेगास = मोठा आणि लिथॉस = दगड (Megas = big, Litho = Stone) अशा दोन शब्दांपासून साधला आहे. नावात सूचित झाल्याप्रमाणे या संस्कृतीचे वैशिष्ट्य असे, की हे लोक मृताला किंवा त्याच्या काही अवशेषांना शिळावर्तुळात, दगडी पेटिकेमध्ये, कुंभात अथवा पाय असलेल्या शवपेटीत पुरीत. केव्हा केव्हा दगडाशिवाय दफनांची निर्मिती किंवा स्मृतिचिन्ह म्हणून शिलास्तंभाची उभारणी केली जाई. मृताच्या सोबत त्याचे दागदागिने, लोखंडी शस्त्रे, तांब्याचे दागिने, मृद्भांडी व प्राणी पुरण्यात येत. मोठ्या शिलांचा या दफनात प्रामुख्याने वापर केल्याने या वस्तूंना 'बृहदश्म' ही संज्ञा प्रचलित झाली.[१]

बृहदश्मयुगीन संस्कृतीच्या लोकांना विविध उद्योगधंद्यांची ओळख होती हे भौतिक पुराव्यावरून सिद्ध होते. धातुउद्योग, कृषी, कुंभारकाम, मणी घडविणे, सुतारकाम, चर्मउद्योग आणि शिला घडविणे इत्यादी उद्योग आणि व्यवसायांचा पुरावा मिळाला आहे.

धातुव्यवसाय :

कुठलाही व्यवसाय करायचा म्हणजे त्याला लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा होय. जोपयत कच्च्या मालाचा पुरवठा आवश्यक गरजेनुसार पुरविला जात नाही तोपर्यंत त्या

धंद्यात फारशी प्रगती होत नाही. यासाठी एकतर कच्च्या मालाचा साठा जवळपास उपलब्ध असायला पाहिजे किंवा पुरवठा दुरून होत असल्यास सतत होणे आवश्यक असते. बृहदश्मीय संस्कृतीच्या लोकांनी आपल्या वसाहतीची निर्मिती कच्चा माल उपलब्ध असेल अशाच भागात केली आहे. विदर्भात मँगनीज, लोह आणि कोळसा मोठ्या प्रमाणात मिळत असल्यामुळे बृहदश्मीय लोकांचे विदर्भातील चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली आणि त्यातल्यात्यात नागपूर जिल्ह्यात केंद्रीकरण झाल्याचे निदर्शनास आले. बृहदश्मीय स्थळे ही प्राचीन खाणीच्या जवळपास असल्याचे मून (Munn)[२] च्या निरीक्षणात आले आहे. करीमनगर जिल्ह्यातील रेंगोडा आणि तेल्लाकुंटा येथे मोठ्या प्रमाणावर लोहाची मळी सापडली. तसेच येथील टेकड्यांवर कॅलशियम कार्बोनेटचे दगड आढळले, तर महबूबनगर जिल्ह्यातील यावलदेवपाड्ड येथे १ ते १॥ मीटर उंचीच्या मातीच्या भट्ट्या आढळल्या. त्याला झोतीसाठी (blast) १५ ते २० सें. मी. चे छिद्र ठेवण्यात आल्याचे आढळते.[३] लोहाचा साठा दक्खनच्या पठारात काही भागात आढळतो. निर्मल (जि. अदिलाबाद) ची खाण प्राचीन काळातसुद्धा प्रसिद्ध होती. तसेच आरमोरी जवळील (जि. गडचिरोली) देऊळगाव येथील लोह उच्च प्रतीचे होते तर कर्नाटकातील होसपेट भाग, धारवाडचा प्रदेश लोखंडासाठी प्रसिद्ध आहे. अ. सुंदर[४] यांना कुप्पनगुडा भागात लोखंडाचे साठे आणि सुवर्ण मोठ्या प्रमाणात सापडते अशी माहिती मिळाली. त्यामुळेच बृहदश्मीय लोकांनी या भागात वसती केली असावी. विदर्भातील नैकुंड येथे लोह शुद्ध करण्याची भट्टी सापडली. या भट्टीची क्षमता ३ किलो शुद्ध लोखंड एका फेरीत मिळविण्याची होती.[५] याशिवाय सुवर्णाच्या खाणी रायचूर दोआबात हुट्टी आणि मस्की येथे आढळल्या. हुट्टी येथील खाण १६०० मीटर लांब आणि २०० मीटर खोल होती.[६] कोलार ही खाण तर प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. येथील काही खाणींच्या कार्बन १४ च्या तारखा उपलब्ध झालेल्या आहेत (१२९०±९० आणि १५००±११५, १९४५±७० आणि १८६५±७०). कोलार आणि हुट्टी ह्या खाणी नवाश्मयुगात प्रसिद्ध होत्या.[७]

प्राचीन धातुविज्ञानाचा दोन प्रकारे अभ्यास करता येतो. प्राचीन कालखंडातील लोकांनी कोणकोणत्या धातूंची हत्यारे–अवजारे बनविताना कसा उपयोग केला, कुठल्या धातूंचा त्याच्या गुणधर्मानुरूप उपयोग करून घेतला याचा विचार करणे आणि वापरलेले धातू कुठल्या दर्जाचे होते, वितळविताना व ओतताना त्यात शुद्धता किती आणली होती याचा विचार करणे. एक भाग भूगर्भातून धातू मिळविण्याचा होता तर दुसरा त्याच्या उपयोजनाचा होता. उपलब्ध पुराव्याच्या आधारे बृहदश्मीय लोक सोने, चांदी, तांबे, ब्राँझ आणि लोखंडाच्या धातूचा वापर करीत. त्यापासून शस्त्रास्त्रे, सुतारकामासाठी, शेतीसाठी लागणारी अवजारे आणि गृहोपयोगी वस्तूंची निर्मिती करीत. हत्याराची किंवा अवजारांची निर्मिती ही स्थानिक स्वरूपाची होती हे आपल्याला धातूच्या पृथक्करणावरून आढळून येईल. माहुरझरी, नैकुंड आणि टाकळघाट (९९·१%, ९९·६% आणि ९८·२%) येथील लोह

धातूच्या अवजारात ०·९% ते १·०९% कर्ब आढळून आला.[८] टाकळघाट येथील लोहात कर्ब आढळला नाही त्यामुळे या भागातील लोखंड कमी कर्बामुळे पोलादाप्रमाणे भक्कम होते. तांबे/ब्राँझपासून बांगड्या, थाळ्या, झाकण, खंजीराची मूठ तयार करीत. या सर्व प्रकारात कथिलाचे प्रमाण अधिक होते. माहुरझरी येथील बांगडीत फार थोडे प्रमाण होते तर टाकळघाटला ८·५% प्रमाण आढळून आले. याव्यतिरिक्त आंध्रप्रदेशातील रायगिर येथे २·1% तर तामिळनाडूतील आदिचनल्लूरला २९·८०% कथिलाचे प्रमाण आढळले.[९] यावरून आपल्याला अनुमान करता येते की दक्षिणेतील ताम्र/ब्राँझमध्ये टिनाचे प्रमाण अधिक आहे. याशिवाय तांब्याच्या वेगवेगळ्या वस्तू बनविताना बांगड्या एक लांबच लांब कांब तयार करून त्याला वळवून कापत असत. तसेच घोड्याचा साज हा तांब्याच्या पातळ पत्र्यापासून कापलेला असून त्यावर जे अलंकारिक कोन बनविलेले आहेत ते तांब्याचे असले तरी पत्र्यामागे लोखंडाने पक्के केलेले दिसतात. एक तांब्याची कळशी पातळ पत्र्यापासून तयार केली असून पत्र्याचे भाग काठाशी वळवून एकमेकात बसविले होते. पक्केपणा यावा म्हणून जोडाच्या भागावर तांब्याचे रिबेट मारलेले आढळले. याचा वापर द्रव्य ठेवण्यासाठी केला जात नसावा तर धार्मिक विधीसाठी केला जात असावा. महत्त्वाची गोष्ट ही, की जोड व त्यावरील रिबेट अत्यंत सफाईदारपणे बसविले होते. या तांत्रिक प्रगतीचा उल्लेख करणे अत्यंत आवश्यक आहे, कारण त्यातून प्रगत कारागिरीचा प्रत्यय येतो. या संयुक्त धातूपासून बनविलेल्या वस्तूवरून तत्कालीन समाजाचे धातुविषयक तंत्रज्ञानाची कल्पना येऊ शकते.

महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीत तांब्याच्या बांगडीत ९८·२1% शुद्ध तांबे, मण्यामध्ये ९९·०६% शुद्ध तांबे व जोर्वेकालीन तांब्याच्या कुऱ्हाडीत ९८% शुद्ध तांबे सापडले.[१०] यावरून असे अनुमान काढता येते, की ताम्रपाषाणयुगात अशुद्ध धातूचे प्रमाण कमी होते. तीच परंपरा विदर्भातील बृहदश्मयुगीन संस्कृतीच्या संदर्भात आढळून येते.

सुवर्णाच्या बाबतीत विदर्भाशिवाय इतरत्र मिळालेल्या वस्तूंचे पृथक्करण न केल्यामुळे विदर्भातील वस्तूंच्या पृथक्करणांचाच विचार करावा लागेल. काही सुवर्णाच्या अलंकारात २५·६% चांदी आहे. सर्वांत जास्त सुवर्णातील अलंकारात ५२·२% इतके चांदीचे प्रमाण आढळले.[११] यावरून असा निष्कर्ष काढता येतो, की एकतर विदर्भातील लोकांना सुवर्णाचा पुरवठा मुबलक होत नसावा किंवा सुवर्णाचे दागदागिने मजबूत होण्याकरिता चांदीचा हेतुपुरस्सर वापर करीत असावेत. काही विद्वानांचे मत आहे की मूळ धातूतच चांदी मिसळलेली असावी अथवा सुवर्ण–रजत (electrum) हा धातू वापरण्याची मध्य आशियाई परंपरा याबाबत कारणीभूत असावी. अशा प्रकारचा सांस्कृतिक संपर्क मात्र भारतातील व मध्य आशियातील बृहदश्मयुग यातील इतर अंगातील साम्य प्रस्थापित झाल्यावर स्वीकृत करता येईल परंतु या ठिकाणी हे नमूद करायला पाहिजे की शुद्ध चांदी पासून तयार केलेले मण्यासारखे अलंकार, त्या काळात घडविले जात.

कुंभारकाम

भांडी ही मानवाच्या जीवनातील प्राथमिक गरज होती व ती मातीची घडविण्याची कला माणसाने प्रथम आत्मसात केली. बृहदश्मयुगात मृद्‌भांडी प्राथमिक गरज बनली असल्यास आश्चर्य नाही. ती नाजूक (Fragile) असल्यामुळे सारखी नवीन तयार करावी लागत. मृद्‌भांडी बनविण्यासाठी लागणारी माती, ती उपलब्ध नसेल तर दुसरीकडून आणणे, आणल्यानंतर शुद्ध करणे, त्यावर वेगवेगळी नक्षी काढणे, भट्टीत भाजणे आणि विकायला नेणे ह्या एवढ्या प्रक्रिया घरातील माणसाला शक्य नाही. यासाठी समाजातील विशिष्ट वर्ग कार्यरत असावा. यावरून मृद्‌भांड्याच्या निर्मितीसाठी श्रमविभागणीचे तत्त्व त्या काळात प्रचलित असावे. बृहदश्मयुगीन संस्कृतीची काळी आणि तांबडी मृद्‌भांडी ही इतर संस्कृतीत आढळणाऱ्या मृद्‌भांड्यापेक्षा वेगळी असल्यामुळे बृहदश्मीय काळात समाजाचा एक वर्ग या भांड्याची निर्मिती करीत असावा. हल्लूर व आजूबाजूच्या परिसरात सापडणारी पांढऱ्या रंगात चित्रित काळी आणि तांबडी मृद्‌भांडी ही तेवढ्याच भागात सापडली असल्याने एकतर विनिमयाने दुसऱ्याकडून घेतली असावीत किंवा अधिक शक्यता अशी, की समाजाचा विशिष्ट वर्ग स्वतःच्या उपयोगासाठीच त्यांची निर्मिती करीत असावा. तसेच अभ्रकयुक्त तांबडी मृद्‌भांडी ही विदर्भापुरती मर्यादित असल्याने या मृद्‌भांड्याची निर्मिती स्थानिक असावी.

मणी

बृहदश्मयुगीन संस्कृतीच्या उत्खननात विविध आकाराचे आणि प्रकाराचे मणी सापडले. हे मणी स्थानिकरीत्या उपलब्ध असलेल्या दगडांचे आहेत परंतु काही वेळेला काच व नीलमण्यापासूनही मणी तयार करीत यावरून त्या काळात काही वेळा मण्याचा विनिमय होत असावा. याशिवाय खापा, टाकळघाट आणि गंगापूर येथे अर्धवट मणी, मणी तयार करण्यासाठी लागणारा दगड आणि मणी तयार करताना झालेला दगडाच्या कपच्या फार मोठ्या प्रमाणात मिळाल्या. तसेच माहुरझरी येथे अर्धवट मणी फार मोठ्या प्रमाणात सापडले. याशिवाय या परिसरात रक्ताश्म, गार, अकिकसारखे दगड उपलब्ध आहेत. यावरून आपल्याला असे अनुमान काढता येते, की बृहदश्मयुगीन संस्कृतीचा एक वर्ग दगड आणणे, त्याचे तुकडे करून गुळगुळीत करणे, मण्याचा आकार देणे व कधी कधी पांढऱ्या रंगात नक्षी काढण्याचे काम करीत असावा.

बृहदश्मीय स्मारकांची निर्मिती

बृहदश्मीय स्मारकांच्या निर्मितीकरता घडविलेल्या दगडांचा उपयोग करण्यात आला तर काही प्रसंगी पर्वतांच्या परिसरातील नैसर्गिक दगडांचाही वापर केल्याचे निदर्शनास आले.

स्मारक तयार करणे, दगड फोडणे, छिन्नीने त्याला विशिष्ट आकार देणे, एकट्यादुकट्याचे किंवा चार-पाच माणसांचेही काम नव्हे. यासाठी कुशल आणि अकुशल अशा दोन्ही प्रकारच्या कारागिरांची आवश्यकता भासत असावी. अशा प्रकारची निर्मिती करणारा एक वर्ग असावा किंवा ज्या खेड्यातील गृहस्थ मृत्यू पावला त्या खेड्यातील लोक एकत्रितरीत्या विशिष्ट काळात दफन स्मारक उभारत असावेत असे दिसते. काही दफनात माणसांची हाडे एकत्रित करून पुरत असल्याचे निदर्शनास आले. त्यावरून पूर्वीच दफन स्मारक तयार करून ठेवीत असावेत. तसेच काही दफनांसाठी वापरलेले दगड त्या त्या क्षेत्रात उपलब्ध नसल्यामुळे आपल्याला अनुमान काढता येते, की अशा प्रकारचे दगड दूरवरून अगोदरच आणून ठेवत असावेत (उदा. भागीमाहिरी (विदर्भ) येथे ग्रेनाइटची मोठी शिला, आंध्रमधील अगिरिपल्ली या भागात कणाश्म उपलब्ध नसल्यामुळे अश्मपेटीसाठी वापरल्या गेलेल्या शिला बऱ्याच लांबून आणल्या असाव्यात तसेच कदम्बपूर येथेही भव्य शिला दफनावर झाकण म्हणून वापरण्यात आल्या होत्या त्याही दुसरीकडून आणल्या असाव्या.)[१२]

पशुपालन उद्योग

बृहदश्मयुगीन संस्कृतीतील सापडलेल्या हाडांच्या प्रमाणाचा अभ्यास तसेच कृषीसाठी वापरल्या जाणाऱ्या अवजारांचे प्रमाण लक्षात घेतले तर या संस्कृतीचे लोक गुरे व बकऱ्या/मेंढ्यांचे कळप पाळत होते. याशिवाय आपल्याला पुढील तक्त्यावरून अंदाज बांधता येईल.[१३]

	टाकळघाट %	नैकुंड %	बोरगाव %	भागिमाहिरी %
गुरे	६३.८८	७०.७	५४.४	६१.८
म्हैस	६.९८	२.६	१.९८	३.१
बकरा	१४.९६	९.६	१३.६७	१६.२
मेंढी	३.१०	—	२.८९	४.०१
डुक्कर	६.२३	३.८९	२.२७	३.०४
घोडा	०.३४	४.०	१.२८	१.२३

याशिवाय कृषी हत्यारात बोरगाव येथे प्राप्त झालेल्या ४४ वस्तूंपैकी केवळ ६ (१३%) तर शस्त्रास्त्रांचे प्रमाण ७७% होते. ब्रह्मगिरी (कर्नाटक) येथील गर्त दफनात २७ पैकी २ कोयते तर मस्की येथील एकंदर ३३ लोखंडाच्या वस्तूंपैकी केवळ एक कोयता नोंदला गेला. नागपूरजवळील टाकळघाट येथे १०२ वस्तूंपैकी २६ वाकस होते. शिवाय शस्त्रास्त्रांचे प्रमाण ३७%, ब्रह्मगिरी येथे ६३% (४४ पैकी) होते.[१४] यावरून ही

भटकी जमात असून गुराढोरांचे कळप पाळीत असावेत. शेती ही पावसावर अवलंबून असल्यामुळे पिकांची हमी नसावी. त्यामुळे पशुपालन या उद्योगधंद्याकडे लक्ष घातले असावे.

एकंदरीत बृहदश्मयुगीन संस्कृतीचे लोक दक्खनच्या परिसरात केंद्रित झाले होते. (इ. स. पू. १००० ते इ. स. २००) आणि त्यांनी आपले विविध व्यवसाय व उद्योग-धंदे या कालखंडात सुरू केले, नव्हे त्यात तांत्रिक प्रगती केली. या संस्कृतीचे लोक भटक्या जमातीचे असले तरी तंत्रज्ञानाच्या बाबतीत अग्रेसर होत असे नमूद करावयास काहीही हरकत नाही. या कालखंडातील एक प्रमुख संस्कृती म्हणून 'बृहदश्मयुगीन' संस्कृतीचा उल्लेख करावा लागेल. शिवाय याच संस्कृतीच्या लोकांनी दक्खनच्या पठारात लोखंडासारख्या कठीण आणि मजबूत धातूपासून हत्यारे आणि अवजारे बनविण्याची कला आत्मसात केली.

संदर्भ वाङ्मय

१. माने, ग. का., **दक्खनमधील बृहदश्मयुगीन संस्कृती** (१९८५) अप्रकाशित प्रबंध, नागपूर विद्यापीठ, नागपूर.
२. मून, एल. **जर्नेल ऑफ दि हैदराबाद जिऑलॉजिकल सर्व्हे**, खंड २, प्लेट १, पृ. ७७–१०४.
३. कृष्णशास्त्री, **दि प्रोटो अँड अर्लि हिस्टारिकल कल्चर्स ऑफ आंध्र प्रदेश**, पृष्ठ ९८.
४. **नैकुंड एक्स्कॅवेशन**, पृ. ८.
५. सुंदर, अ. यांच्या सौजन्याने.
६. अग्रवाल, डि. पी. आणि मार्गबंधू, सी. **पुरातत्त्व** नं. ४, पृ. १३८–४०.
७. कित्ता.
८. देव, शां. भा., **इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन रीसेन्ट ॲडव्हान्स रीसर्चेस इन इंडियन ऑर्किऑलॉजी**, (सायक्लोस्टाईल प्रत) पृ. ११.
९. कित्ता.
१०. देव, शां. भा., **पुरातत्त्व विद्या**, (१९७६), पृ. १३३.
११. देव, शां. भा. **मधू** (१९८१), पृ. ३४.
१२. माने, ग. का. **पूर्वोक्त**, पृ. ९४, ९७, ९९–१००.
१३. देव, शां. भा. **इन्टरनॅशनल कॉन्फरन्स ऑर्किऑलॉजी**, पृ. ११.
१४. कित्ता.

मंडळवृत्त

(१) भेटी

(१) शनिवार दि. २० ऑगस्ट १९८८ रोजी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. वि. ग. भिडे ह्यांनी राजवाडे संशोधन मंडळास भेट दिली. त्यांनी राजवाडे वस्तुसंग्रहालयातील ऐतिहासिक कागदपत्रे, उत्खननातील अवशेष, ऐतिहासिक मूर्ती...ताम्रपट नाणी–भांडी, चित्रे ह्यांची पाहणी केली. पुरंदरे दप्तर, १०९ कलमी बखर ह्याविषयी माहिती समजावून घेतली.

वैज्ञानिक संशोधनाची जोड देऊन प्राचीन काळापासूनच्या भारतीय संस्कृतीच्या विकासमय पैलूंवर प्रकाश पाडण्याचे काम मंडळाने करावे असे मौलिक विचार त्यांनी व्यक्त केले.

त्यांचे समवेत धुळ्याचे विद्यमान नगराध्यक्ष मा. चंद्रकान्त केले, धुळे येथे नव्याने स्थापन झालेल्या मराठी प्रगत अध्ययन संस्थेचे दानशूर प्रणेते मा. डॉ. ज. का. वाणी (कॅनडा) आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

(२) प्रसिद्ध कादंबरीकार श्री. शिवाजी सावंत, मराठी साहित्यातील जाणकार डॉ. माधवराव नावडीकर ह्यांनीही मंडळास भेटी देऊन समाधान व्यक्त केले आणि संशोधनपर काही विधायक सूचना केल्या.

(३) संस्थात्मक भेटीच्या संदर्भात धुळे येथील विद्यावर्धिनी महाविद्यालयातील एम. ए. इतिहासच्या विद्यार्थी–विद्यार्थिनींनी अभ्यासपूर्ण रीत्या मंडळातील कागदपत्रे, मूर्ती, नाणी यांची पाहणी केली.

शालेय पातळीवर कासारे, ता. साक्री, जि. धुळे येथील खानदेश गांधी कै. बाळूभाई मेहता विद्यालयातील सुमारे ३०० विद्यार्थी–विद्यार्थिनींनी राजवाडे वस्तुसंग्रहालयाची पाहणी केली.

(२) कृतज्ञता

महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री ना. शरदरावजी पवार ह्यांनी मुख्यमंत्री निधीतून मंडळाच्या विकासात्मक कामासाठी रु. २५,०००/— (रुपये पंचवीस हजार) चा निधी दिला.

हा निधी मंडळास मिळवून देण्याचे कामी धुळे शहराच्या आमदार डॉ. सौ. शालिनीताई बोरसे ह्यांनी जातीने परिश्रम घेतले. मंडळ उभयतांचे ऋणी आहे.

(३) अन्य कार्यक्रम

ज्यांचे घरी इतिहासाचार्य राजवाडे ह्यांचे वास्तव्य असे. असे, मंडळाचे संस्थापक प्रणेते कै. भा. ना. तथा तात्यासाहेब भट त्यांच्या निवासस्थानी मंडळाच्या संशोधन–प्रकाशनार्थ

" कै. भा. वा. तथा तात्यासाहेब भट स्मारकाचा कोनशिला सामारंभ" मंडळाचे कार्याध्यक्ष मा. श्री. बाळासाहेब मुंदडे ह्यांचे शुभहस्ते गणेशचतुर्थीच्या शुभ दिनी पार पडला.

भट कुटुंबियांनी वास्तू तुलनेने अल्प मोबदल्यात मंडळास प्रदान केली.

गणेश चतुर्थीच्या दिवशी परंपरेप्रमाणे मंडळाने मा. श्री. बाळासाहेब मुंदडे ह्यांचे हस्ते ' लेखनप्रशस्ती ' हस्तलिखिताचे प्रकल्पाचा शुभारंभ झाला.

(४) खोदकामाची पाहणी :

इंदवे (ता. साक्री) येथील ग्रामस्थांनी खोदकाम करून शोधून काढलेल्या सुमारे यादव कालीन २३–२४ पायऱ्यांच्या घाट–हौद स्थानाला मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. बाळासाहेब मुंदडे, प्रमुख चिटणीस डॉ. प्र. न. देशपांडे, कोषाध्यक्ष श्री. ज. शं. अग्रवाल, ज्येष्ठ कार्य कारिणीसदस्य श्री. लोटणदादा माळी आणि क्युरेटर प्रा. व. ग. हजिरनीस ह्यांनी भेट दिली, खोदकामाची पाहणी केली, ग्रामस्थांबरोबर चर्चा केली. मातीची खापरे, गाडगी, खुजा इत्यादी अवशेष मंडळात आणले.

(५) खास उल्लेखनीय :

मुंबई येथील म. रा. पुराभिलेख विभागाच्या वतीने प्रकाशित केलेल्या शिवछत्रपतींच्या पत्रांचे प्रतिरूप दर्शन ह्या पुस्तकात मंडळाच्या संग्रहातील तीन अस्सल पत्रांचा समावेश आहे.

विक्रीसाठी ठेवलेले इतर ग्रंथ

(२५) छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे (डॉ. प्र. न. देशपांडे) पृ. ३००, उपलब्ध प्रती २००, किंमत ६५ रुपये.

विशेष सवलत : वरील २५ पुस्तकांचा संच किंमत रु. ८४४ चा केवळ रु. ६५० ला मिळेल. २ अगर अधिक ग्रंथ घेणाऱ्यास १५ टक्के कमिशन. टपालखर्च वेगळा.

संशोधक त्रैमासिक : इतिहास संस्कृती संशोधनाला वाहिलेले दर्जेदार त्रैमासिक गेली ५६ वर्षे अविरतपणे प्रकाशित होत आहे. **जानेवारी १९८९ पासून वार्षिक वर्गणी रु. ३५** करण्यात आली आहे. या **वर्षापासून प्रत्येक अंकाची किंमत १० रु. राहील.** वर्ष १ ते २९ वर्षातील अंक उपलब्ध नाहीत. वर्ष ३० ते ५६ वर्षातील उपलब्ध असलेल्या सर्व अंकांचा संच केवळ रुपये ४०० त उपलब्ध. (त्यात सुवर्ण महोत्सवी अंक, काँग्रेसशताब्दी विशेषांक, हीरकमहोत्सवी अंक, योग चिंतामणी, आज्ञापत्र यांचा समावेश आहे.)

मुख्य चिटणीस

१ ऑक्टोबर १९८८ — **इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ**

धुळे ४२४००१

' संशोधक ' त्रैमासिक

इतिहास-संस्कृती संशोधनाला वाहिलेले दर्जेदार त्रैमासिक गेली छपन्न वर्षे अविरतपणे प्रकाशित होत आहे.

जानेवारी १९८९ पासून वार्षिक वर्गणी रुपये ३५/- मात्र करण्यात आली आहे. या वर्षापासून प्रत्येक अंकाची किंमत रुपये १० राहील.

तहहयात वर्गणी **जानेवारी १९८९** पासून रुपये ३००/- मात्र करण्यात आली आहे.

मात्र डिसेंबर १९८८ चे पूर्वी तहहयात वर्गणी फक्त रुपये २००/- च राहील. तरी या संधीचा अवश्य लाभ घ्यावा.

विशेष सूचना : आजीव वर्गणीदार व्यक्तीप्रमाणे संस्थांनाही होता येते. व्यक्तीसाठी आजीव वर्गणी दोन वर्षात चार हप्त्यांमध्ये स्वीकारण्याची सोय केली आहे.

संपादक

' संशोधक ' त्रैमासिक

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ

धुळे